पुणे विद्यापीठाचे प्रकाशन केंद्र 'ब्रँड' म्हणून नावारूपाला आणणार : कुलगुरू

पुणे, दि. २२ (प्रतिनिधी) : "पुणे विद्यापीठाच्या प्रकाशन केंद्राला पुनरुज्जीवित करण्याचे प्रयत्न सुरू केले असून, आगामी काळात प्रकाशन व्यवसायातील प्रतिष्ठेचा 'ब्रँड' म्हणून हे केंद्र नावारूपास येईल," असा विश्वास पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांनी व्यक्त केला.

विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागातील सी. व्ही. रमण सभागृहात जाधव यांच्या हस्ते 'निसर्गातील नॅनो रचना : विज्ञान आणि तंत्रज्ञान' या पुस्तकाचे प्रकाशन झाले. त्या वेळी ते बोलत होते. विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ. अरुण निगवेकर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. 'कॉन्टिनेंटल प्रकाशना'चे अनिरुद्ध कुलकर्णी, पुस्तकाचे लेखक डॉ. रामचंद्र नऱ्हे व लेखिका डॉ. सुलभा कुलकर्णी या वेळी उपस्थित होत्या.

डॉ. जाधव म्हणाले, "या प्रकाशन केंद्राच्या माध्यमातून उत्तमोत्तम अभ्यासपूर्ण पुस्तके प्रकाशित करण्यात येणार आहेत. या केंद्रातील यंत्रसामग्रीदेखील अद्ययावत करण्यात आली आहे. तसेच, पुणे विद्यापीठाने यापूर्वी काही दर्जेदार पुस्तके प्रकाशित केली होती. त्यांच्या सुधारित आवृत्यांचे पुनर्मुद्रण करण्याचे काम सर्वप्रथम हाती घेतले आहे." सर्वसामान्यांना समजेल, अशा सोप्या भाषेत विज्ञान मांडणे ही शास्त्रज्ञांची जबाबदारी आहे, असेही ते म्हणाले.

डॉ. निगवेकर पुस्तकाबद्दल म्हणाले, "विज्ञानातील अनेक गोष्टी पुस्तकरूपाने सर्वसामान्यांपर्यंत पोहोचलेल्या आहेत; परंतु 'नॅनो तंत्रज्ञान' हे नवीन शास्त्र आहे. त्यामुळे त्याबद्दल फार कमी लोकांना माहिती आहे. हे पुस्तक रंजक पद्धतीने 'नॅनो' तंत्रज्ञानाची माहिती करून देऊ शकेल. विज्ञान जेव्हा सूक्ष्मतेकडे जाऊ लागले, तेव्हा त्याचे नियम व गुणधर्म बदलवावे. गुणधर्म आणि नियम यांच्यातील परस्परसंबंधाची माहिती हे पुस्तक देते." शिक्षकांना त्यांच्या सर्वोत्तमाचे पेट मिळवून देण्यासाठी विद्यापीठाने स्वतंत्र यंत्रणा निर्माण करावी, अशी अपेक्षाही डॉ. निगवेकर यांनी व्यक्त केली.

लेखकांच्या वतीने डॉ. कुलकर्णी यांनी मनोगत व्यक्त केले. अनिरुद्ध कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले. अमृता कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले व आभार मानले.



■ पुणे विद्यापीठाच्या रमण सभागृहात 'निसर्गातील नॅनो रचना : विज्ञान आणि तंत्रज्ञान' पुस्तकाचे प्रकाशन मंगळवारी पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांच्या हस्ते झाले. या वेळी (डावीकडून) पुस्तकाचे लेखक डॉ. रामचंद्र नऱ्हे, लेखिका डॉ. सुलभा कुलकर्णी, विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ. अरुण निगवेकर, 'कॉन्टिनेंटल प्रकाशना'चे अनिरुद्ध कुलकर्णी, अमृता कुलकर्णी

लोकमत 23/9/08

इतिहास जाणून घेण्याचा गरज : पुरंदरे

पुणे (प्रतिनीधी) : परदेशातील संशोधक भारतात येऊन येथील इतिहासाचा अभ्यास करतात. आपल्याला मात्र त्याबाबत अजिबात आस्था नाही. त्यामुळे आपला इतिहास आपल्याला कळेल का आणि तो जाणून घेण्यासाठी आपण प्रयत्न करणार आहोत का? असा सवाल शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांनी येथे उपस्थित केला.

आविष्कार प्रकाशनतर्फे डॉ.सुवर्णलता जाधवराव लिखीत 'सरदार पिलाजी जाधवराव: व्यक्ती आणि कार्य' या चरित्रात्मक पुस्तकाचे प्रकाशन बुधवारी पुरंदरे यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. प्रकाशन सोहळ्या दरम्यान युथ प्रेस क्लबतर्फे पत्रकारितेत उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल दै 'पुढारी'च्या प्रतिनिधी अश्विनी सातव यांचा विशेष सत्कार करण्यात आला. त्याचबरोबर इंटेलिजन्टस पुणेच्या विनीता देशमुख आणि पुण्यनगरीच्या सुषमा नेहरकर यांचाही सत्कार यावेळी करण्यात आला. याप्रसंगी पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव, विद्यापीठातील इतिहास विभागप्रमुखरेखारानडे,इतिहासाचेअभ्यासतज्ज्ञ निनाद बेडेकर आदी उपस्थित होते.

ते म्हणाले, जुन्या इतिहासाचा आढावा घेतला, तर विविध क्षेत्रात उत्तुंग भरारी घेणाऱ्या आजच्या तरुणांना नवीन प्रेरणा नक्कीच मिळेल, असे इतिहासाचे महात्म्य आहे. यामुळे इतिहास बोलका केला पाहिजे कारण तो बोलका केला, तर त्यातील बळ कानातून, मनात, मनातून मनगटात उतरेल आणि असाच एका पडद्यामागे असणाऱ्या कतृर्त्ववान मराठा सरदाराचा इतिहास बोलका करण्याचे काम सुवर्णलता जाधव यांनी या ग्रंथाच्या माध्यमातून केले आहे.

जगामध्ये इतिहासाबद्दल प्रचंड अनास्था असणारा भारतासारखा दुसरा देश नाही. आपल्याकडील प्रदीर्घ इतिहासाबद्दल बोलतांना लोक केवळ भावनावश होतात, मात्र लेखनासाठी कोणीही पुढाकार घेत नाही.यामुळे सुवर्णलता जाधव यांनी आपल्या संशोधन ग्रंथाच्या माध्यमातून तुलनेने दुर्लक्षित झालेल्या मराठी सरदाराची कामगिरी प्रकाशझोतात आणण्याचे केलेले कार्य गौरवास्पद आहे.

युथ प्रेस क्लबतर्फे पत्रकारितेच्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महिला पत्रकारांचा सत्कार कुलगुरू नरेंद्र जाधव यांच्या हस्ते करण्यात आला.यावेळी पुरस्कार स्वीकारतांना दै 'पुढारी'च्या प्रतिनीधी अश्विनी सातव.

पुढारी 24/9/08.

UoP to revamp publication dept

REPORTER
reporters@sakaaltimes.com

GANESHKHIND ROAD: University of Pune (UoP) will be the brand name from now onwards.

For the same, the publication department will be reworked soon, said Vice Chancellor Narendra Jadhav.

Best of the education books and books that will be useful for research works will be published here.

The other machines needed for the same have been purchased and old ones are being repaired to ensure smooth operations.

Jadhav was speaking at a book release function at the Raman Hall at the UoP campus on Wednesday.

maha-times 23/9/08

चिंतन इमेज मेकर्स